# पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,

नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशनजवळ, आकुर्डी, पुणे-४४.

दुरध्वनी क्रं. ०२०-२७६५२९३४/३५ / २७१६६००९

-------------------------------------------------------------------------------------------------

**ई - निविदा सुचना क्र.१ सन २०१८-१९**

मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे-४४ खालील कामाकरीता, नोंदणीकृत अनुभवी ट्रॅव्हल व्यावसायीकांकडून ई- निविदा मागवित आहेत.

| अ.क्र | ई-निविदा क्रमांक | कामाचे नांव | एक वर्षाचा अंदाजीत खर्च रु. ( Estimated cost) | बयाणा रक्कम रु. | निविदा कालावधी | ई-निविदा फॉर्म फी रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | प्राधिकरणातील कार्यालयीन कामासाठी भाडेतत्वावर खाजगी वाहने पुरविणेसाठी ई-निविदा. | ३५,००,०००/- | ३५,०००/- | १२ महीने | ५००/- + GST |

| | |
|---|---|
| Online निविदा खरेदी व तयारीचा कालावधी | दि.२९/०६/२०१८ वेळ १०.०० पासून ते दि. १७/०७/२०१८ वेळ - १७.०० पर्यत. |
| Online निविदा बंद होण्याची वेळ | दि.१७/०७/२०१८ रोजी वेळ १७.०० पर्यंत |
| निविदा सादर करण्याचा कालावधी submission | दि.२९/०६/२०१८ वेळ १०.०० पासून ते दि. १७/०७/२०१८ वेळ - १७.०० पर्यत. |
| निविदा उघडण्याचा दिनांक | दि.२०/०७/२०१८ वेळ दुपारी १५.०० वा. |

**टिप :-**

1. ई-निविदाबाबत सविस्तर माहिती, अटी व शर्ती या www.pcntda.org.in or www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
2. निविदेबाबतचे पुरवणी किंवा शुध्दीपत्रक हे वेबसाईट वरच प्रसिध्द केले जाईल. यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाणार नाही.

सही/-

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

# चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे -४४.

वेबसाईट - www.pcntda.org.in

ई-मेल – pro@pcntda.org.in दुरध्वनी क्र.२७६५२९३४/३५/२७१६६००९


प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी ,

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,

आकुर्डी, पुणे-४४.

विषय :- प्राधिकरणाच्या कामासाठी खाजगी वाहने भाडेतत्वाने घेणेबाबत निविदा.

संदर्भ :- दै.-------------------- (पुणे.) मधील जाहीरात दिनांक ----------------------------

महोदय,

१) मी/आम्ही वरील विषयांचे संदर्भात जोडलेल्या प्रपत्रामध्ये ई- निविदा भरत आहे / आहोत.

२) मी/आम्ही माहितीपत्रकातील पात्रतेच्या अटीनुसार ई-निविदा भरण्यास पात्र असून माझ्या / आमच्या पात्रतेबाबत पुराव्याची कागदपत्रे online सादर केली आहेत.

३) नापरतावा व फॉर्म फी रक्कम रू. ५००/- + GST, १% बयाणा रक्कम रू.३५,०००/- Netbanking e-paypent gateway द्वारे SB MOPS मध्ये online जमा केली आहे.

४) निविदेच्या सर्व अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत व त्या संबधीचे हमी पत्र निविदे सोबत अपलोड केले आहे.

निविदाधारकाची स्वाक्षरी -------------------------------------------

निविदाधारकाचे फर्मचे नांव --------------------------------------------

पत्ता --------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------

मोबाईल क्रमांक -------------------------------- ई-मेल -----------------------------------

# पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे -४४.

## -: निविदा अटी व शर्ती :-

१) निविदेची फॉर्म फी रू.५००/- + GST, १% बयाणा रक्कम Netbanking e-paypent gateway द्वारे www.mahatenders.gov.in या वेबसाईट वरील सुचनेप्रमाणे SB MOPS मध्ये online जमा करावी.

२) निविदा ग्राहयता कालावधी (Bid Validity Period) निविदा सादर (Submission) केल्याच्या दिनांकापासून १२० दिवसांसाठी ग्राहय राहील.

३) यशस्वी निविदाधारकास कार्यादेश देण्याअगोदर सुरक्षा अनामत रक्कम रु.१,४०,०००/- D.D. व्दारे कार्यालयाकडे जमा करावी लागेल. (निविदा मंजूर झाल्यास कार्यालयाने मागणी केलेल्या प्रत्येक वाहनासाठी रू.२०,०००/- (अक्षरी रू. वीस हजार फक्त) सुरक्षा अनामत रक्कम म्हणून एक वर्षासाठी विनाव्याजी ठेवावी लागेल. नवीन वाहन पुरवठा केल्यास प्रत्येक वाहनासाठी २०,०००/- सुरक्षा अनामत रक्कम जमा करावी लागेल.) अटी व शर्तीचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. वाहनांचे देखभाल, दुरूस्ती अपघात किंवा इतर काही नुकसान झाल्यास त्याची सर्व जबाबदारी वाहन मालकाची राहील. आपणास कार्यालयाच्या मागणीनुसार वाहने पुरवावी लागतील. वाहनांची संख्या अंदाजे ७ ते १० किंवा त्यापेक्षा कमी/जास्त असू शकतील. आपणास मागणी करूनही आपण वाहन पुरविण्यास असमर्थ ठरल्यास व ते वाहन दुसरीकडून भाड्याने घ्यावे लागल्यास, त्याचा खर्च आपल्या देयकातून वसूल करण्यात येईल.

४) यशस्वी निविदाधारकाने भरलेली बयाणा रक्कम त्याच्या इच्छेनुसार सुरक्षा अनामत रकमेत रुपांतरीत होऊ शकेल, अन्यथा बयाणा रक्कम ही पुर्ण सुरक्षा अनामत रक्कम भरलेनंतर परत करण्यात येईल.

५) मासिक स्वरूपात भाड्याने घेतलेल्या वाहनाची आवश्यकता दररोज १२ तासापर्यंत (स.८.३० ते संध्या.८.३०) राहील.

६) वाहन भाडेतत्वावर घेण्याचा कालावधी कार्यादेश मिळाल्यापासून १ वर्षे पर्यंत राहील. काम समाधानकारक वाटल्यास आणखी १ वर्ष मुदतवाढ देण्यात येईल किंवा पुरवठा सेवा समाधानकारक नसल्यास १ वर्षापूर्वी देखील करार रद्द करण्यात येईल. याबाबत १५ दिवस अगोदर पूर्व सूचना देण्यात येईल.

७) वाहनाची संख्या व प्रकार आवश्यकतेप्रमाणे कमी अथवा जास्त होऊ शकतील.

८) शासकीय, निमशासकीय, खाजगी कार्यालयास वाहने पुरविणेचा (कार/जीप) अनुभव आवश्यक आहे. अनुभव प्रमाणपत्र विहित नमुन्यातीलच जोडणे आवश्यक आहे.

९) वाहन स्वच्छ, पांढरा रंग व उत्कृष्ठ देखभाल केलेले असावे. तसेच ते जानेवारी २०१५ नंतरचे मॉडेल असावे आणि त्यासाठी निविदा धारकाने सेवा करा व्यतिरिक्त इतर शासनाचे प्रचलित सर्व प्रकारच्या करासहीत दर (inclusive of all taxes, except Service Tax) नमूद करावे.

१०) इंधन, ऑईल, दुरूस्ती (सर्व्हिसींग), विमा पॉलीसी व सर्व शासकीय कर, नियमानुसार वाहन चालकाचा पगार व वाहनाचा घसारा, टोलचार्जेस इ. सर्व बाबींचा खर्च वाहन मालकाने करावयाचा आहे. वाहनचालकाकडे वाहन चालविण्याचा कायमस्वरूपी परवाना असणे आवश्यक आहे.

११) वाहन चालकासाठी पांढरा गणवेष वाहन मालकाकडून पुरविण्यात यावा. वाहन वापराचा कालावधी सकाळी ८.३० ते सायंकाळी ८.३० वाजेपर्यंत राहील. एखाद्या दिवशी या कालावधीपेक्षा अधिक काळ जर वाहनाची आवश्यकता असेल तर त्याची पुर्वसूचना दिली जाईल. त्या सूचनेप्रमाणे वाहन उपलब्ध होणे आवश्यक आहे. महिन्यातील शासकीय सुट्टया सोडून कामाचे दिवशी वाहन पुरविण्यात यावे. सुटीच्या दिवशी वाहनाची आवश्यकता वाटल्यास अगोदर कळविण्यात येईल. त्यानंतरच सुटीचे दिवशी वाहन पुरविण्यात यावे. त्याकरिता वेगळा आकार दिला जाणार नाही.

१२) वाहनाचा अपघात झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ठेकेदाराची / वाहन मालकाची राहील. त्याबाबत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई प्राधिकरणामार्फत मिळणार नाही.

१३) वाहनाचा सर्व समावेशक विमा (Full Insurance/ Comprehencive Insurance) काढलेला असणे आवश्यक असून Insurance policy live असणे आवश्यक आहे.

१४) मासिक भाडेतत्वावर घेतलेल्या वाहनाची धाव एका महिन्याला १०००,१५००,किंवा २००० कि.मी. पेक्षा कमी धावल्यास किमान १००० कि.मी साठीचा मान्य दर १५०० कि.मी साठीचा मान्य दर व २००० कि.मी साठीचा मान्य दरानुसार रक्कम देण्यात येईल. मासिक भाडेतत्वावरील वाहनाकरीता प्रतिमाहे १००० कि.मी, १५०० कि.मी व २००० कि.मी. पर्यंतचे दर व विहित कि.मी च्या पुढील प्रति कि.मी चा दर मागविणेत येत असून, जर विहीत कि.मी पेक्षा रनिंग कमी झाले तरी त्या किमान १००० कि.मी, १५०० कि.मी. व २००० कि.मी. चा मान्य दरानुसार रक्कम देय होईल. व विहित कि.मी. पेक्षा जास्त रनिंग झालेस मान्य दराने रक्कम देय होईल तसेच एका दिवसात १२ तासापेक्षा जास्त वेळ थांबल्यास मान्य दराने रक्कम देय होईल.

१५) डिझेल, पेट्रोल, ऑईल इ. दरात वाढ झाल्यास मासिक भाड्यात वाढ करण्यात येणार नाही.

१६) जी वाहने प्राधिकरणाकडे पुरवठा करण्यात येणार आहेत, त्या वाहनांची कागदपत्रे, (आरसी व टीसी पुस्तक) हवा प्रदूषण प्रमाणपत्र, विमा पॉलिसी, वाहनचालकाचे लायसेन्स, इ. ची साक्षांकित झेरॉक्स प्रत, सक्षम अधिकाऱ्यांने दिलेला प्रवासी वाहतुक परवाना (टुरिस्ट परमिट) आणि शॉपॲक्ट लायसेन्सची झेरॉक्स प्रत प्राधिकरणाकडे देणे आवश्यक आहे.

१७) कार्यादेश मिळाल्यानंतर प्राधिकरणाकडे वाहने भाड्याने देण्यासाठी तसेच भाड्याने लावलेल्या वाहनामध्ये बदल करण्यासाठी किंवा नवीन वाहन पुरविण्यासाठी जनसंपर्क विभागाची परवानगीने घेणें आवश्यक आहे. जनसंपर्क विभागाच्या परवानगी शिवाय परस्पर वाहन पुरविल्यास त्याचे देयक अदा करण्यात येणार नाही.

१८) वाहनांचे भाडे महिना पूर्ण झाल्यानंतर दिले जाईल. त्यासाठी वाहनाचे रोजचे लॉगबुक अद्ययावत भरून संबंधीत अधिकाऱ्याकडून साक्षांकीत करून घ्यावे. तसेच सदरचे देयक विभागप्रमुख म्हणून प्रशासन अधिकारी यांचे मार्फत प्रमाणित व साक्षांकित करुन सादर करावे.

१९) वाहनाचे किलोमिटर मोजणी प्राधिकरण कार्यालयापासून धरण्यात येईल व दिवसाच्या शेवटची मोजणी प्राधिकरण कार्यालयात घेण्यात येईल. मुख्यालय सोडून जर मुक्काम पडला तर नेहमीच्या दरानेच चार्जेस दिले जातील.

२०) प्राधिकरणाचे कार्यक्षेत्र हे पुणे व पिंपरी चिंचवड शहर असे राहील/समजण्यात येईल. तसेच या कार्यक्षेत्राबाहेर वाहन गेल्यास व मुक्काम झाल्यास निविदेतील मंजूर दरानेच जादा आकार दिला जाईल. या व्यतिरिक्त इतर कोणताही आकार अनुज्ञेय राहणार नाही.

२१) शासनाचे प्रचलित शासन निर्णयानुसार कर आकारणी करण्यात येईल.

२२) अटी व शर्तीचा भंग झाल्यास रू.१०००/- प्रति दिन दंड आकारण्यात येईल.

२३) वाहन नादुरूस्त झाल्यास ते त्वरीत दुरूस्त करून घेण्यात यावे. तसेच कार्यालयाची गैरसोय होऊ नये म्हणून त्या कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरूपात पर्यायी वाहन उपलब्ध करून देण्यात यावे. तसेच दिलेले पर्यायी वाहन योग्य नसल्यास ते नाकारणेचा अधिकार प्राधिकरणाचा राहील.

२४) कमीत कमी दराची निविदा स्विकारणेत येईल. निविदा मंजूरीनंतर १५ दिवसात रू.५००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल. करारनामा १५ दिवसाचे आत न केल्यास अथवा टाळाटाळ केली तर बयाणा रक्कम जप्त करून निविदा रद्द केली जाईल. करारनामा जरी एक वर्षाचा केला असला तरी प्राधिकरणास वाटल्यास त्याचा कालावधी कमी करता येईल अथवा मुदतवाढ देण्यात येईल.

२५) वाहन भाड्याच्या एकूण अंदाजीत रक्कमेच्या ३०% उत्पन्न हे वाहन भाड्यापासून दर वर्षी निविदा धारकाला / ट्रॅव्हल कंपनीला प्राप्त होत असले पाहीजे.

२६) अयशस्वी निविदा धारकांची बयाणा रक्कम यशस्वी निविदाधारकास कार्यादेश दिल्यानंतर परत करण्यात येईल व यशस्वी निविदाधारकाची अनामत / बयाणा रक्कम सुरक्षा ठेव खाती वर्ग करण्यात येईल. तसेच नवीन अतिरिक्त वाहनासाठी देखील प्रती वाहन रू.२०,०००/- सुरक्षा ठेव जमा करुन चलनाची प्रत जनसंपर्क विभागामध्ये जमा करावी लागेल.

२७) प्राधिकरणाकडे जमा सुरक्षा ठेव ही एकत्रित पणे ठेव गृहीत धरण्यात येईल व या रकमेमधूनच कोणत्याही वाहनामुळे झालेल्या नुकसान भरपाईची रक्कम वसूल करता येईल व ही सुरक्षा ठेव रक्कम करार संपुष्टात आल्यावर परत करण्यात येईल.

२८) निविदा धारकाकडून वाहतूक परवाना (टुरिस्ट परमिट) व पिवळ्या रंगाची नंबर प्लेट असलेली वाहने कार्यालयास पाठविण्यात यावीत. नॉन परमिटचे वाहन आल्यास त्याचा वापर नाकारला जाईल व नियमाप्रमाणे दंड लावण्यात येईल. वाहनचालक नसल्यास / पेट्रोल / डिझेल नसल्यास व त्यामुळे वाहन बंद असल्यास इतर कोणत्याही कारणाने वाहन उपलब्ध नसल्यास रू.१,०००/- प्रतिदिन दंडआकारणेत येईल. ८ दिवसापेक्षा जास्त दिवस वाहन उपलब्ध न झाल्यास, वरील रू.१,०००/- प्रती दिन या दंडाव्यतिरीक्त मागणी केलेली रक्कम ही मासीक देय रक्कमेच्या prorata प्रमाणे देय होईल.

२९)कराराप्रमाणे वाहने न पुरविल्यास निविदा व करार रद्द करण्यात येईल व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

३०)पुरविण्यात येणाऱ्या वाहनापैकी निविदा धारक / कंपनीच्या स्वत:च्या मालकीची किमान ५ वाहने (कार/जीप) असणे आवश्यक आहे. पुरविण्यात येणारी उर्वरीत इतर वाहने दुसऱ्याच्या मालकी हक्काची असतील, तर संबंधित वाहनाच्या मालकाशी किमान १ वर्षाचा करार केलेला असला पाहीजे त्याची छायांकींत प्रत कार्यालयास द्यावी.

३१)निविदाधारकाने प्राधिकरणाकडे वाहन देताना किंवा कमी करताना जनसंपर्क विभागाची परवानगी घ्यावी. वाहन कमी /जास्त करणेचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

३२)करार झाल्यानंतर योग्य पध्दतीने वाहन पुरविण्याची जबाबदारी निविदाधारकाची आहे. वारंवार वाहन नादुरूस्त होत असेल तर कार्यालयाचा खोळंबा होऊ शकतो, म्हणून फक्त तीन वेळा नादुरूस्त वाहन दुरूस्तीसाठी परवानगी दिली जाईल. तीन वेळेपेक्षा अधिक वेळा नादुरूस्त झाल्यास ते वाहन रद्द करण्यात येईल व सदर वाहनाऐवजी सुस्थितीतील पर्यायी वाहन पुरवणेची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

३३)वाहनचालकाची वर्तणूक ही चांगली असली पाहीजे, कोणत्याही वाहनचालका विरूध्द प्राधिकरणातील कर्मचारी/ अधिकारी यांची तक्रार आल्यास दोन दिवसात त्या वाहनचालका ऐवजी नवीन वाहन चालक पुरविण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

34) निविदा स्विकृती, दिनांक व वेळ वृत्तपत्रातील जाहीराती मध्ये प्रसिध्द केला जाईल. सविस्तर माहिती या कार्यालयाच्या www.pcntda.org.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी ई-मेल pro@pcntda.org.in व दुरध्वनी क्रं.-०२० -२७१६६००९ येथे संपर्क साधावा.

३५) ऑनलाईन ई-निविदा प्रक्रियेत लिफाफा क्र.1 मध्ये खालील कागदपत्रांची स्कॅन कॉपी सादर (Upload /Submission) करणे आवश्यक आहे.

**१) लिफाफा क्र.१ :- तांत्रिक लिफाफा**

१) निविदा फॉर्म फी रू. ५००/- + GST
२) बयाणा रक्कम रू. ३५,०००/-
३) ट्रॅव्हल कंपनीचे अद्यावत शॉप ॲक्ट लायसेन्स
४) पॅन कार्ड
५) किमान ५वाहने (कार/जीप) पुरवठा केलेबाबतचे विहित नमुन्यातील अनुभव प्रमाणपत्र

६) स्वमालकीच्या वाहनांची यादी व त्यांचे R.C/TCBook/Insurance Policy
७) सर्व्हिस टॅक्स रजिस्ट्रेशन
८) मागील ३ वर्षाचे नफा तोटा पत्रक (वित्तिय वर्ष सन २०१४-१५,२०१५-१६,२०१६-१७)
९) अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र.

**२) लिफाफा क्र.२ :- दराची निविदा**

३६)लिफाफा क्र.१ मध्ये नमुद केलेली आवश्यक कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतर पात्र निविदा धारकाचे, online लिफाफा क्र.2 उघडेल. अन्यथा लिफाफा क्र.2 उघडले जाणार नाही.

३७) मासिक स्वरुपात भाडयाने घ्यावयाच्या वाहनांसाठी निविदा प्रपत्रामध्ये नमुद केलेल्या दरांवर, प्राधिकरणाव्दारे सेवा कर वेगळा देण्यात येईल. मात्र इतर उर्वरित कर हे संबंधितांनी देणे बंधनकारक राहील. तसेच शासनाचे प्रचलित शासन निर्णयानुसार आवश्यक ते कर भरावे लागतील. त्यानुसार निविदा प्रपत्रामध्ये दर नमुद करावेत.

३७) वरील प्रमाणे ई-निविदेतील अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत, असे हमी पत्र निविदाधारकाने लिफाफा क्र. १- तांत्रिक लिफाफ्यात Upload करावे. नमूना सोबत जोडला आहे.

३८) निविदा स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे - ४४ यांनी राखून ठेवलेले आहेत. त्यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

३९) निविदा पूर्व बैठकीस किंवा निविदा उघडतेवेळी फक्त निविदाधारक किंवा प्राधिकृत प्रतिनिधी यांनाच उपस्थित राहणेची परवानगी दिली जाईल.

निविदाधारकाची सही :- ------------------------------------------------------------

निविदाधारकांचे नांव व पत्ता :- ------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

दुरध्वनी/मोबाईल क्रमांक :- ------------------------------------------------------------

# हमीपत्र

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे - ४४ यांनी कार्यालयीन दैनंदिन कामकाजाकरीता खाजगी वाहन पुरविण्यासाठी मागविलेल्या ई-निविदेतील सर्व अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत.

दिनांक :-

ठिकाण :-

स्वाक्षरी :-

निविदाधारकाचे नांव :-

पत्ता:-

दुरध्वनी / मोबाईल क्र. :-

---

(**टिप :-** सदरील हमी पत्र तांत्रिक लिफाफा मधील अ.क्र. ९ साठी जोडावयाचे आहे.)

# <u>अनुभव प्रमाणपत्र</u>

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
आकुर्डी, पुणे - 44.

विषय :- अनुभव प्रमाणपत्र.

मे.--------------------------------------------------------------- या संस्थेने या कार्यालयास पुढीलप्रमाणे वाहनांचा (कार/जीप) भाडेतत्वावर पुरवठा केला आहे.

| अ.क्र. | वाहनांचा प्रकार | वाहन पुरवठा केलेले वर्ष / कालावधी |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

मे. ------------------------------------------------------------------ यांचे कामकाज समाधानकारक आहे.

दिनांक :- सही :-

ठिकाण :- कार्यालयाचा शिक्का

# पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे - ४४.

## निविदा प्रपत्र मासिक स्वरूपात भाड्याने घ्यावयाच्या वाहनांसाठी नमूद केलेले दर

| अक्र | वाहनांचे वर्णन मॉडेलचे नांव (जानेवारी २०१५ नंतरचे) | प्रतिमाह खालील कि.मी करिता (सर्व करासहित) नमुद करावयाचे दर | | | | | | विहित मर्यादेपेक्षा जास्त धाव झाल्यास प्रति कि.मी. चा जादा दर | | एका दिवसातील १२ तासानंतरचा जादा दर प्रति तासास नमूद करावा. (रूपये) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १००० कि.मी साठी दर (रूपये) | | १५०० कि.मी साठी दर (रूपये) | | २००० कि.मी साठी दर (रूपये) | | | | | |
| | | ए.सी | नॉन ए.सी | ए.सी | नॉन ए.सी | ए.सी | नॉन ए.सी | ए.सी | नॉन ए.सी | ए.सी | नॉन ए.सी |
| १ | स्विफ्ट डिझायर | | | | | | | | | | |
| २ | टाटा सुमो | | | | | | | | | | |
| ३ | ईटीओस | | | | | | | | | | |

निविदाधारकाची सही ---------------------------------------------------------

निविदाधारकांचे नांव व पत्ता ---------------------------------------------------------
---------------------------------------------------------
---------------------------------------------------------
---------------------------------------------------------

दुरध्वनी क्रमांक ---------------------------------------------------------